# राशिभविष्य - सप्टेंबर, २०२१.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या - त्या राशीच्या प्रत्येक जन्मनक्षत्रासाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत हर्षल(वक्री) असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने संशोधन कार्यात सहजासहजी प्रगतिकारक होणार नाही. शिवाय या हर्षलमुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर, लहरी असा घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे कसलाही धाक, दडपण असह्य होईल. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, खोडकर, हूड अशा प्रकारची होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात वाद, गैरसमज, भांडणे होणे संभवते. शिवाय आर्थिक चिंताही त्रस्त करतील. या राशीच्या पंचम स्थानी सिंह या स्वराशीत रवि असून हा रवि स्वराशीत व स्वस्थानी असल्यामुळे फारसा प्रतिकुल होणार नाही. पण त्याच्यामुळे काही मंडळींना स्वतः:च्या व संततीच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. शिवाय अपघातभय असल्याने सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. काही मंडळींना नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होईल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत गेल्यावर अनुकुल होतील व दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील, कार्यसिद्धी होईल. अर्थलाभ होणेही शक्य दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी प्रथमपासून अस्तंगत मंगळ व बुध हे दोन ग्रह आहेतच. पैकी मंगळ ग्रह अस्तंगत असल्यामुळे फारसा आरोग्यविघातक होणार नाही; पण

त्याच्यामुळे उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करील. जपा. रक्तविकार, हृदयविकार अशापैकी आजार होणेही संभवते. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. त्याशिवाय चोरी होणे किंवा आर्थिक नुकसान होणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या या स्वराशीत असलेला बुध बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. त्याच्यामुळे अपेक्षित कार्यसिद्धी होईल. तसेच धनलाभ होणेही संभवते. हा बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत जात आहे. त्यावेळी तो प्रतिकुल होईल व दुःखदायक घटना घडतील. भांडणे होणेही संभवते. .या राशीच्या सप्तम स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र ग्रह असून या शुक्रामुळे या राशीच्या प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. विवाहितांना वैवाहिक सुख लाभेल.. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना त्वचारोगाचा तर काहींना रक्तविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या केतूमुळे कुटुंबात वाद, भांडणे होणेही संभवते. शिवाय वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे शक्य दिसते. .जपा. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो फारसा प्रतिकुल होणार नाही. पण या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत असलेला वक्री गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत आल्यावर येथील शनि -गुरु वकिलीसारखे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होतील .शनि ग्रह लोखंड, कोळसा व्यापार असणारांना अनुकुल असला तरी वक्री असल्याने अपेक्षेइतका अनुकुल व लाभदायक होणार नाही. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत नेपच्यून(वक्री) असून त्याच्यामुळे कुमार्गी मित्रांपासून मनस्ताप होईल व नैराश्य येईल. तसेच आर्थिक नुकसान होणे, अर्थप्राप्तीस विलंब होणे, आर्थिक घोटाळे होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेशाची व श्रीहनुमानाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः “ तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ ओम अग्नये नमः: “ तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू असून त्याच्यामुळे सतत मनस्तापदायक व अपमानास्पद घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यातून सूडभावना निर्माण होणेही संभवते. जपा. मनावर ताबा ठेवा. या राशीच्या काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह या स्वराशीत रवि ग्रह असून महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असणार आहे. त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता, मुलांपैकी कोणाचे अनारोग्याची चिंता, प्रिय जनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व, नोकरीत वरिष्ठांचा जाच अशापैकी घटना घडल्यास मन अस्वस्थ राहील. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत जात आहे. या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत अस्तंगत मंगळ आणि बुध हे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह संततिसुखाचे दृष्टीने मनस्तापदायकच असल्याचा अनुभव येईल.. संततीपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे मनस्तापदायक आचरण अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल. जपा. येथील बुध दिनांक २२ पासून या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत गेल्यावर अनुकुल होईल व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अपेक्षित कार्यसिद्धी करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा या स्वराशीत असलेला शुक्र कोणत्याही कलेतील प्रगतीस अनुकुल असला तरी षष्ठ स्थान शुक्रास अनुकुल नसल्याने कलेत अपेक्षित प्रगती होणे संभवत नाही. तसेच कलानिपुण कलाकारांना आपली कला जगासमोर दाखविण्यास संधीच मिळणार नाही. त्यामुळे या राशीच्या काही कलाकारांना नैराश्य येईल व ते व्यसनाधीन होण्याची शक्यताही दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून महिन्याच्या उत्तरार्धात दशम स्थानी कुंभ राशीत असलेला वक्री गुरु या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत येत आहे. त्यामुळे हे दोन्ही वक्री ग्रह फारसे अनुकुल झाले नाहीत तरी प्रतिकुलही होणार नाहीत. उलट आध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे मनःशांतीच मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धात वक्री गुरु ग्रह या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत असताना काही प्रमाणात बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल होईल. पण मनस्थिती अस्थिर, चंचल अशीच राहील.

या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत (वक्री)हर्षल असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील, नको त्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल व शत्रुत्व निर्माण झाल्यास काही मंडळींना जिवावरच्या प्रसंगाशीही मुकाबला करावा लागेल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्रये नम::” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे
त्यांनी “ ओम ब्रह्माय नम:: “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी ओम सोम सोमाय नम::” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या तृतीय स्थानी सिंह या स्वराशीत रवि आहे. त्यामुळे . तो महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारे अनुकुल,सुखकारक व धनदायक होईल. आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. पण या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत बुध व अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह असून माहिन्याच्या उत्तरार्धात तृतीय स्थानी असलेला रवि ग्रह चतुर्थ स्थानी कन्या राशीत येत आहे. बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळेल; पण मंगळामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत असलेला बुध महिनाच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत जात आहे. या राशीच्या पंचम स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र ग्रह आहेच. येथील शुक्र कोणत्याही कलाक्षेत्रातील मंडळींना आपल्या कलेत प्रगती करण्यास अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुधामुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येण्याची दाट शक्यता आहे. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, आचारविचार उच्च होतील, मन उदार होईल व समाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत असलेला वक्री गुरु या अष्टम स्थानी मकर राशीत येत आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात हा गुरु ग्रह अध्यात्मात रस असणारांना काही प्रमाणात अनुकुल होईल व

उपासनेद्वारे मनःशक्ती प्राप्त करणे शक्य होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा गुरु ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. पण या अष्टम स्थानी असलेला वक्री शनि प्रतिकुल व अनारोग्यकारक होण्याची व दुःखद घटना निर्माण करणारा होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून तो द्रव पदार्थ व्यापार असणारांना व मनोवैज्ञानिकांना काही प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मित्रांशी वाद, भांडणे होतील. पण अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधानात बाधा निर्माण होणे संभवते. पण त्याच्यामुळे अर्थलाभ होण्याची शक्यता असून काही मंडळींना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. श्रद्धा असेल तर दुर्गा देवीची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्री दुर्गा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी " ओम नमः शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूनर्वसु आहे त्यांनी " ओम अदितीये नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या धनस्थानी सिंह या स्वराशीत रवि असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत जात आहे. रवि ग्रह सिंह या स्वराशीत असला तरी ते स्थान त्याला अनुकुल नसल्याने तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल; व त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. त्याशिवाय आर्थिक नुकसान होणेही संभवते. तसेच तो अग्नि तत्वाचा ग्रह असल्याने काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. विशेष करून डोळ्याचे आजार होणे संभवते. तसेच कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीयस्थानी कन्या राशीत गेल्यावर अनुकुल होईल व या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना सुखकारक व लाभदायक होईल. क्वचित कोणास मानाचे स्थान किंवा एखादे उच्च पद मिळणेही शक्यआहे. या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत अस्तंगत मंगळ व बुध असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील मंगळ शत्रुराशीत अस्तंगत असल्याने त्याचा काहीही प्रभाव दिसून

येणार नाही. पण त्याच्यामुळे इजा होणे संभवते. बुध ग्रहामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होईल. जपा. तसेच हितशत्रूचा त्रास होणेही संभवते. हा बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत गेल्यावर गृहसौख्य व मित्रसुख मिळणार असले तरी त्याच्यामुळे आर्थिक नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा या स्वराशीत प्रथमपासून शुक्र ग्रह असून तो सुखदायक होईल. ऐषाराम मिळेल व या राशीच्या ज्या मंडळींची शेतीवाडी आहे अशांना तो लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी असलेला वक्री गुरु ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत येत आहे. येथील वक्री शनि फारसा प्रतिकुल होणार नाही; मनस्थिती शांत राहील पण त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवत नाही. महिन्याच्या उत्तरार्धात वक्री गुरु ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत आल्यावर ज्यांचे प्रेमसंबंध आहेत त्यांच्या प्रेमसंबंधात, अर्थलाभात व स्नेहसंबंधात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून आहेच. तो जलभयकारक व विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्रास तो अनुकुल असला तरी वक्री अवस्थेत असल्यामुळे आपल्या नोकरी-व्यवसायात या राशीच्या मंडळींना अपेक्षित प्रगती करणे शक्य होणार नाही. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींच्या संतति सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याची ओढ निर्माण होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो विचार मनातून काढून टाकावा. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नम::" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नम::" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी " ओम सर्पाय नम::" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच स्वराशीत रवि ग्रह असून तो अनारोग्यकारक होईल. तसेच त्याच्यामुळे स्वभाव अधिकारशाही चालविणारा होईल. मनासारखें न घडल्यास असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत गेल्यावर या राशीच्या काही मंडळींना नेत्रविकाराचा आजार होण्याची शक्यता दिसते. तसेच कुटुंबात वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत प्रथमपासून अस्तंगत मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. येथील अस्तंगत मंगळ ग्रहामुळे आर्थिक चिंता व आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची चिंता त्रस्त करील. तसेच येथील बुधामुळे दुःखदायक घटना घडणे संभवते. असे असले तरी तो आर्थिक दृष्ट्या लाभदायक होईल. हा बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत जात आहे. त्यावेळी त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूंचा त्रास सहन करावा लागणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या तृतीय स्थानी तुळा या स्वराशीत प्रथमपासून शुक्र ग्रह आहेच. तो लाभदायक होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना धनलाभ, काहींना भूमिलाभ तर काही शासकीय नोकरदार मंडळींना प्रतिष्ठा किंवा मानाचे स्थान मिळण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून या राशीच्या ज्या मंडळींचा स्वभाव अहंकारी आहे अशा मंडळींचे घरीदारी कोणाशीही पटणार नाही. तसेच त्यांना सतत कसली तरी चिंता त्रस्त करील. त्याशिवाय तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत असलेला वक्री गुरु या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत येत आहे. येथील वक्री शनीमुळे गैरसमजुती, वाद, भांडणे होतील, व त्यातून शत्रुत्व निर्माण होईल. जपा. काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी असलेला वक्री गुरु या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत आल्यावर आरोग्य सुधारेल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. पण तो या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक जीवनात संकटे निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे दूरच्या प्रवासाचा किंवा परदेशगमनाचा योग असला तरी तो वक्री असल्याने प्रवासात अडचणी निर्माण होणे संभवते.

तसेच संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अडचणी, अडथळे सहन करूनच प्रगतीसाठी प्रयत्न करावे लागतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व शासकीय नोकरीत असणारांपैकी काहींना पदोन्नती प्राप्त होईल; तर क्वचित कोणाचा सन्मानही होणे संभवते. श्रद्धा असेल तर या राशीच्या मंडळींना श्रीविष्णुची उपासना मन:शांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नम::" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नम::" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नम::" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या व्ययस्थानी सिंह या स्वराशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत येत आहे. या रवि ग्रहास दोन्ही स्थाने प्रतिकुलच असल्यामुळे या महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल. त्यामुळे सतत प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. मानभंग होईल, शरीरपीडा सहन करावी लागेल, थकवा येईल. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक अनारोग्य, मनस्ताप, चिंताभय त्रस्त करील. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. या राशीच्या प्रथम स्थानी प्रथमपासून अस्तंगत मंगळ व बुध हे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच असणार आहेत. पण येथील बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या धनस्थानी तुला राशीत गेल्यावर लाभदायक होईल. या राशीच्या धनस्थानी याच स्वराशीत शुक्र असून तो सर्व प्रकारे अनुकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींना स्त्री-वर्गाकडून होणारा मनस्ताप सहन करावा लागेल. तसेच मानसिक दुःखही होईल. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे स्वभाव स्वार्थी, संशयी, व्यवहारी असा होईल व चिकाटीने कार्य करून आपल्या बुद्धिमत्तेची शक्ती व्यक्त करता येईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत असलेला वक्री गुरु ग्रह या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत जात आहे. महिन्याच्या पूर्वार्धात हा गुरु अनुकुल व आरोग्यदायक होईल.व महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत गेल्यावर काही प्रमाणात सर्व प्रकारे अनुकुल होईल.

त्याच्यामुळे काही मंडळींना अर्थलाभ होईल, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे जमेल, या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत असलेल्या वक्री नेपच्यूनमुळे काही मंडळींना फसवणुकीचा त्रास सहन करावा लागेल, काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील व या राशीच्या बहुतेक सर्व मंडळींना काल्पनिक अनारोग्याची बाधा अस्वस्थ करील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो अपघातकारक असल्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी सतत सावधानतेने आचरण करणे आवश्यक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संततिसुखात व वैवाहिक सुखात थोडी बाधा येणे संभवते. पण त्याच्यामुळे प्रवासयोग येतील. श्रद्धा असेल तर श्रीदुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल व मनःशांती मिळेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “दुर्गा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या लाभस्थानी सिंह या स्वराशीत रवि असून येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होईल. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. आरोग्य उत्तम राहील, आर्थिक लाभ होतील, व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल, पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल; व त्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मनस्ताप, मानभंग होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत अस्तंगत मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे अनारोग्य होणे, मनस्थिती अस्वस्थ राहणे, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, मानहानी होणे, आर्थिक नुकसान होणे, मित्रद्रोह होणे, मन चंचल होणे, कुसंगतीचा त्रास होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच स्वराशीत शुक्र असून तो सर्व प्रकारे अनुकुल व सुखकारक होईल. वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो आर्थिक दृष्ट्या प्रतिकुल होईल व त्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि

असून त्याच्यामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. त्यामुळे नैराश्य येणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी असलेला वक्री गुरु या राशीच्या चतुर्थ स्थानी आल्यावर परिस्थितीत सुधारणा होईल; तरीसुद्धा नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल; पण या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रस आहे त्यांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधनाची आवड असणारांना तो प्रगतिकारक होईल. या राशीच्या सप्तमस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे जीवनसाथी/संगिनीचा स्वभाव लहरी, चंचल, विक्षिप्त असा होणे संभवते. त्यामुळे पतिपत्नीत सतत्त गैरसमज, वाद, भांडणे, मतभेद होतील. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे क्षणी संशय, गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो दीर्घायुष्यकारक होईल व या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळीना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसाहक्काने असा अचानक धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची . उपासना व श्रीहनुमान उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो सुखकारक होईल; पण त्याच्यापासून वाहन धोका असल्याने रस्त्यावरून जाताना सतत सावधानतेने चाला. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला वक्री गुरु या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत येत आहे. येथील वक्री शनीमुळे काही मंडळींना अपेक्षित अशी नोकरी मिळेल; किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल; पण सहजासहजी न मिळता अडचणी, अडथळे सहन करूनच मिळू शकेल. शिवाय येथील शनीमुळे भावंडविषयक

एखादी चिंता त्रस्त करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला वक्री गुरु महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुखदायक होणार असला तरी नातेसंबंधातील कोणाकडून तरी असह्य मनस्ताप दिला जाणे संभवते. हा वक्री गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीयस्थानी मकर राशीत गेल्यावर या राशीच्या लेखकवर्गाला काही प्रमाणात अनुकुल होईल. प्रवासयोग येईल; पण प्रवासात मनस्ताप होणे संभवतें . त्याशिवाय एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो दशम या व्यवसायस्थानास पूरक असला तरी या राशीच्या मंडळींनी कोणत्याही गोष्टीचा खूप खोल विचार करत बसू नये. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकार बळावण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे विविध कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी सिंह या स्वराशीत रवि ग्रह असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे हा रवि या राशीच्या मंडळींना नोकरी-व्यवसायात महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, प्रगतिकारक, लाभदायक व सुखकारक होईल. या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत अस्तंगत मंगळ व बुध हे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळामुळे अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट-परिश्रम करावे लागतील. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण त्याच्यामुळे एखादी मूल्यवान वस्तू मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. येथील बुध ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होईल व सुखसमाधान लाभेल. मित्रलाभही होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा बुध या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मानहानी, अपयश येणे संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी तुळा या स्वराशीत
शुक्र असून तो सुखकारकच होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१) धनु -** या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता असते. तसेच आर्थिक संकटे त्रस्त करण्याची शक्यता असते. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत असलेला वक्री गुरु या राशीच्या धनस्थानी आल्यावर काही मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धात हा वक्री गुरु या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत असताना या राशीच्या मंडळींना एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत वक्री गुरुसह वक्री नेपच्यूनही आहेच. येथील नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील होणे संभवते. अध्यात्म व गूढ संशोधनाची आवड असणारांना हा नेपच्यून काही प्रमाणात अनुकुल होईल. काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र व कलाक्षेत्र असणारांना अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होणार नाही. प्रेमप्रकरणे असणारांच्या प्रेमातही अडचणी निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे स्वभाव धूर्त, कावेबाज बनेल. पण या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील, अन्य जातिधार्माच्या मित्रांपासून लाभ होईल; पण काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या भाग्यस्थानी सिंह या स्वराशीत रवि असला तरी तो फारसा अनुकुल होणार नाही. त्याच्यामुळे मानसिक ताण, अनारोग्य, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम या व्यवसायस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व नोकरी-व्यवसायात लाभदायक घटना घडतील. या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत बुध व अस्तंगत मंगळ हे दोन ग्रह आहेतच. येथील बुध ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल.. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा बुध या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत गेल्यावर धनलाभ व मित्रलाभ होणेही संभवते. पण अस्तंगत मंगळ प्रतिकुलच होईल. या राशीच्या लाभस्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे सर्व प्रकारे सुखसमाधान मिळेल, धनलाभ होईल व मनःशांती लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची

उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच स्वराशीत वक्री शनि असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी असलेला वक्री गुरु या राशीच्या प्रथम स्थानी या मकर राशीत येत आहे. महिन्याच्या संपूर्ण काळात येथील शनि स्वराशीचा असला तरी तो वक्री असल्याने प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे स्वतःचे व जीवनसाथीचे अनारोग्य, नैराश्य, नियोजित कार्यात अडथळे निर्माण होणे, कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होणे अशापैकी घटना घडणे संभवते. पण या शनीमुळे काही मंडळींना प्रवासयोग येईल. महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी असलेला वक्री गुरु या राशीच्या प्रथम स्थानी मकर राशीत आल्यावर परिस्थितीत थोडी सुधारणा होईल व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व लाभदायक होईल. हा गुरु महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत असताना काही प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईलच. या राशीच्या धनस्थानी प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. पण तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मन अस्वस्थ राहील, कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, वास्तुसुख मिळणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. जपा. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण या राशीच्या ज्या मंडळींचा दलाली, कमिशनवर व्यवसाय आहे त्यांना हा राहू लाभदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी सिंह या स्वराशीत रवि असला तरी तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल त त्याच्यामूळे अनारोग्य, दुःख, अपयश, विरोध आदि सहन करावे लागेल. त्याशिवाय तो संततिसुखातही बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावरही प्रतिकुलच असणार आहे. या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत बुध व

अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. येथील बुध महिन्याच्या अखेरच्या सप्तांहात या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत गेल्यावर मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. पण या राशीच्या दशम स्थानी स्वराशीत शुक्र असूनही त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतु असून तो सुखकारक होईल व त्याच्यामुळे प्रवासयोग येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. .दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करतांना मनापासून श्रद्धेने या राशीच्या ज्या मंडळींचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ ओम विश्वेदेवाय नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील वक्री गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यय स्थानी मकर राशीत जात आहे. या मकर राशीत वक्री शनि आहेच. प्रथम स्थानी असलेल्या वक्री नेपच्यूनमुळे मनस्थिती अतिशय कोमल होणे संभवते. त्यामुळे मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच नैराश्य येणे संभवते. ;पण या प्रथम स्थानी असलेला गुरु वक्री असला तरी काही प्रमाणात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. तसेच तो बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात हा गुरु या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत गेल्यावरही अध्यात्मात रस असणारांना व सामाजिक कार्याची ओढ असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत असलेला वक्री शनि प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी आर्थिक व्यवहार सावधानतेने व खात्री करूनच पूर्ण करावेत. शिवाय त्याच्यामुळे अनारोग्य व मानहानी होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे उत्तम स्मरणशक्ती लाभेल व तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशवारीची संधीही

मिळू शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. शिवाय त्याच्यामुळे कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होण्याची शक्यता असते. या राशीच्या सप्तम स्थानी सिंह या स्वराशीत रवि असून तो केंद्रस्थानी असल्याने भाग्योदयकारक होईल. पण तो अनारोग्यकारक होंण्याचीच दाट शक्यता दिसते. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत जात आहे. त्यावेळी तो अधिक प्रतिकुल होईल व कौटुंबनिक सुखात बाधा निर्माण करील. हाती घेतलेल्या कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील. या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत बुध व अस्तगत मंगळ हे दोन ग्रह आहेतच. पैकी मंगळ अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे वीज व पाणी यांपासून धोका आहे. बुध ग्रहामुळे कार्यसिद्धी होईल, यश मिळेल व सुखसमाधान लाभेल. पण तो महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या भागयस्थानी तुळा राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे कार्य दिरंगाई होणे, नियोजित कार्यात अडथळे निर्माण होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा या स्व - राशीत शुक्र आहेच . तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना कीर्ती -प्रसिद्धी मिळू शकेल. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातचा नोकरी-व्यवसाय सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे तो नोकरी-व्यवसायच मनापासून करावा. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी " ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन** - या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे स्वभाव, मन व बुद्धी चंचल, अस्थिर होणे संभवते. तसेच अविचारी आचरण होणेही शक्य दिसते. अविचाराने फटकळपणे बोलून समोरच्याचा अपमान होणे संभवते.. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व हातून कर्तृत्वसंपन्न कार्य घडेल. पण त्याच्यामुळे बंधुसुखात

बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह या स्वराशीत रवि असून तो दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण काही मंडळींना हृदयविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत जात आहे. त्यावेळी तो केंद्रस्थानी असल्याने भाग्योदयकारक होईल. पण त्याच्यामुळे उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या या स्वराशीत बुध व अस्तंगत मंगळ हे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापारव्यवसाय असणारांच्या भागीदारीत विविध कारणांनी बाधा येऊ शकेल. जपा. येथील बुधामुळे भांडणे होणे, दुःख सहन करावे लागणे संभवते. येथील बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत जात आहे. तेव्हा तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यसिद्धी होईल. व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा या स्वराशीत प्रथमपासून शुक्र आहेच. तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे कमी श्रमात अर्थप्राप्ती होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो प्रतिकुलच होईल व तो अपघातभयकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे आवश्यक होईल. त्याच्यामुळे कुटुंबात वाद, भांडणे होणे संभवते. तसेच तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना रक्तविकाराचा, मुख-दंतविकाराचा किंवा त्वचाविकाराचा आजार होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो साधारणपणे अनुकुल होईल पण त्याच्यामुळे संततीपैकी कोणाला तरी कसला तरी मनस्ताप त्रस्त करील. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत जात आहे. महिन्याच्या पूर्वार्धात व्ययस्थानी असलेला वक्री गुरु अध्यात्मात रस असणारांना व सामाजिक कार्याची आवड असणारांना काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास होणे व अपेक्षाभंग होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा वक्री गुरु या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत गेल्यावर काही प्रमाणात अनुकुल होईल व अर्थलाभ होईल व काही मंडळींना वाहनसुख मिळेल. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. विवाहेच्छू वधूवरांना विवाहयोग येईल.

या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत असलेल्या  वक्री नेपच्यूनमुळे  मनस्थिती  चिंताग्रस्त  होईल, मानसिक व्यग्रता वाढेल  व  गहरे  नैराश्य  येणे संभवते.  श्रद्धा  असेल  तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल  होईल व मन:शांती  मिळेल.  दररोज सकाळी स्नान  झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी  गुरुचरित्रा "चे पठण करा.  त्याशिवाय  दररोज सकाळी स्नान  करताना मनापासून श्रद्धेने  ज्यांचे  जन्मनक्षत्र  पूर्वाभाद्रपदा  आहे  त्यांनी " ओम  अजैकचरणाय  नम::" तारक मंत्राचा, ज्यांचे  जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा  आहे  त्यांनी " ओम अहिर्बुध्न्याय नम:" तारक मंत्राचा  आणि  ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती  आहे  त्यांनी ओम पूषाय  नम::" तारक  मंत्राचा १०८ वेळा  जप करावा.

=====ooooo0ooooo=====